**निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश**

**(दिनांक २४/०३/२०२६)**

१. वादींनी जाहीर ठरावाकरिता व निरंतर ताकीदीकरिता दावा दाखल करून त्यासोबत अर्ज (नि.क्र.०५) दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तहसीलदार माळशिरस यांनी रस्ता केस क्र. ३१/२०२२ मध्ये दिनांक २४.१२.२०२५ रोजी दिलेला निर्णय सदर दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय लागेपावेतो स्थगित करण्याकरिता व त्या आदेशाच्या आधारे प्रतिवादी क्र. १ यांनी वादींच्या मिळकतीमधून नवीन रस्ता करू नये तसेच वादींच्या पिकांचे नुकसान करून वादींच्या मिळकतीस स्वतः, नोकर–चाकर, एजंट अगर अन्य इतराकरवी कसलेही प्रकारे हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णनः–**

२. जिल्हा सोलापुर उपजिल्हा माळशिरस पैकी मौजे तोंडले येथील वादींच्या शेतजमिनी गट क्र. ११२, १११/१/अ/१, १११/२ च्या पश्चिम बाजूने बांधावरून व प्रतिवादींचे शेत गट क्र. १०५, १०८ च्या पूर्व बाजूने बांधावरून तहसीलदार माळशिरस यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे शेत गट क्र. १०७ व १०९ मध्ये जाण्याकरिता मंजुर केलेला रस्ता हा दाव्याचा विषय आहे. (त्यास यापुढे सोयीकरीता 'दावा रस्ता' असे संबोधण्यात येत आहे.)

**वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–**

**३.** मौजे तोंडले, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील शेतगट क्र. ११२ वादी क्र. १ ची मिळकत आहे. शेत गट क्र. १११/१/अ/१ वादी क्र. २ ची मिळकत असून शेत गट क्र. १११/२ ही मिळकत वादी क्र. २ ते ४ यांच्या मालकीची आहे. शेत गट क्र. १०७ व १०९ या मिळकती प्रतिवादी क्र. १ च्या आहेत. शेत गट क्र. १०५/१ ही मिळकत प्रतिवादी क्र. ७ ची आहे. शेत गट क्र. १०५/२ ही मिळकत प्रतिवादी क्र. ८ च्या मालकीची आहे. शेत गट क्र. १०८ ही मिळकत प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्या मालकीची आहे.

४. शेत गट क्र. ११२, १११/१/अ/१ व १११/२ या वादींच्या शेतजमिनीमधून प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ व १०९ मध्ये जाण्याकरिता कोणत्याही प्रकारचा रस्ता अस्तित्वात नाही. प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. २ ते ८ एकाच भावकीतील असून त्यांच्या मुळच्या जमिनी एकाच पूर्वजांच्या आहेत. वादी यांच्या मिळकतींचा सर्व्हे नं. ९३ असून प्रतिवादी यांच्या मिळकतींचा सर्व्हे नं. ९१ आहे. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांच्या शेत मिळकतींच्या पूर्व बाजूतून रस्ता पूर्वापार पासून अस्तित्वात आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या शेत मिळकती गट क्र. १०७ व १०९ च्या पूर्व बाजूकडून असणारा पूर्वापार गावनकाशातील रस्ता नांगरून क्षेत्र वहिवाटी खाली आणलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी देखील त्यांच्या मिळकतीमधून पूर्व बाजूने सर्व्हे नंबरच्या बांधालगत पूर्वापार पासून अस्तित्वात असलेला वहिवाटीचा रस्ता नांगरून ते क्षेत्र वहिवाटीखाली आणलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना त्यांच्या शेत मिळकतीकरीता एकमेकांच्या क्षेत्रातून वहिवाटीचा

रस्ता अस्तित्वात होता व सदर रस्त्याने प्रतिवादी क्र. १ ते ८ त्यांच्या शेत मिळकतींची वहिवाट करून उत्पन्न घेत होते.

५. प्रतिवादी क्र. १ यांनी तहसीलदार माळशिरस यांच्याकडे प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्याविरूध्द त्याची जमीन गट क्र. १०९ मध्ये जाणे–येणेकरिता प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या मिळकतींच्या पूर्व बाजूकडून दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्याची मागणी करण्याकरिता रस्ता केस क्र. एस. आर. १७/२०२२ केली होती. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या मालकीची जमीन गट क्र. १०७ च्या उत्तर बाजूस असणारा पूर्व–पश्चिम चालीचा उजनी कॅनॉल उपफाटयाच्या रस्त्यास मिळणेसाठी प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या मिळकतीमधून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे कलम १४३ प्रमाणे सर्व्हे नंबर बांधावरून रस्त्याची मागणी केली होती. सदर रस्ता त्यापूर्वी अस्तित्वात असताना प्रतिवादींनी रस्ता नांगरून वहिवाटीखाली आणल्याने तो रस्ता नष्ट झाला होता. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने तहसीलदार यांच्याकडे अर्ज करून त्या रस्त्याची मागणी केली होती.

६. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी संगनमत करून वादींना त्रास देण्याच्या उद्देशाने वादींच्या शेतमिळकतींमध्ये कसल्याही प्रकारचा रस्त्याचा हक्क प्रतिवादी क्र. १ याचे शेत जमीन गट क्र. १०७ व १०९ मध्ये जाण्याकरिता नसताना वादींचे विरोधात पुन्हा नव्याने रस्ता केस क्र. ३१/२०२२ हे वादी यांच्या मिळकतीमधून नवीन रस्ता मागणीचे प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमचे कलम १४३ प्रमाणे दाखल केले. वास्तविक यातील प्रतिवादी क्र. १ याने यापूर्वीच रस्ता केस क्र. १७/२०२२ प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या मिळकतींमधून रस्त्याची

मागणी केली असताना व सदरचे प्रकरण प्रलंबित असताना पुन्हा नव्याने रस्ता केस क्र. ३१/२०२२ वादी व प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या विरूध्द दाखल केले.

७. प्रतिवादी क्र. १ याने त्याची शेतजमीन गट क्र. १०९ मध्ये जाण्याकरिता रस्त्याची मागणी केलेली आहे. शेत गट क्र. १०९ च्या उत्तरेस प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचा शेत गट क्र. १०८ आहे. शेत गट क्र. १०८ च्या उत्तरेस शेत गट क्र. १०५ प्रतिवादी क्र. ७ व ८ यांच्या मालकीचा आहे. शेत गट क्र. १०५ च्या उत्तरेस शेत गट क्र. १०७ प्रतिवादी क्र. १ चा आहे. शेत गट क्र. १०७ च्या उत्तरेस लगत १२ फुट पूर्व–पश्चिम चालीचा उजनी १९ फाटयाचा रस्ता आहे. सदर रस्त्याच्या उत्तरेस उजनी कॅनॉल आहे व उजनी कॅनॉलच्या उत्तरेस वादी क्र. १ चे शेतजमीन गट क्र. ११२ आहे.

८. तहसीलदार माळशिरस यांनी भौगोलिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता वाद रस्ता प्रतिवादी क्र. १ ला मंजुर केला. वास्तविक प्रतिवादी क्र. १ याने त्याची शेतजमीन गट क्र. १०९ मध्ये जाणे–येणेकरिता वाद रस्त्याची मागणी केली. परंतु शेत गट क्र. १०९ उजनी कॅनॉलच्या दक्षिणेस असून वादी क्र. १ चे शेत गट क्र. ११२ उजनी कॅनॉलच्या उत्तरेस आहे. उजनी कॅनॉलपासून वादी क्र. १ यांचा गट क्र. ११२ जवळपास १२ ते १५ फुट उंचावर आहे. अशा परिस्थितीत वादीच्या शेत गट क्र. ११२ व १११ मधून वाद रस्ता तयार करणे अशक्य आहे. तसेच वादीची शेतजमीन क्र. १११ च्या पश्चिम बाजूने बांधालगत पाण्याचे चेंबर तसेच पाण्याची चालू विहीर आहे. तसेच वादींचे शेत गट क्र. १११ व ११२ प्रतिवादींचे शेत गट क्र. १०७,१०५,१०८,१०९ च्या क्षेत्रापेक्षा ६ ते ७ फुट उंचावर आहे. अशा

परिस्थितीत वाद रस्ता वादी व प्रतिवादींच्या वरील शेतांच्या बांधावरून काढणे अशक्य असताना तहसीलदार यांनी वरील बाबींचा विचार न करता वाद रस्ता प्रतिवादी क्र. १ ला मंजुर केलेला आहे.

९. गावनकाशामध्ये प्रतिवादी क्र. १ च्या शेतजमिनीमध्ये जाणे–येण्याकरिता प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या क्षेत्रातून रस्ता अस्तित्वात असताना प्रतिवादींनी संगनमताने तो रस्ता नांगरून वहिवाटी खाली आणला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ वादीच्या शेतजमिनीच्या बांधावरून वाद रस्त्याची मागणी करत आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या शेतजमिनीत ऊसासारखी नगदी पिके घेवून प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या शेतजमिनींच्या पूर्व बाजूने असणा–या बांधालगत असलेल्या दक्षिणोत्तर चालीच्या रस्त्याने त्याची वाहतुक कारखान्याकडे केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे क्षेत्र रस्त्याअभावी काहीही पडीक राहिलेले नाही. तहसीलदार यांनी वाद रस्ता मंजुर केल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या मिळकतीचे पश्चिम बाजूचे बांध फोडून तसेच बांधालगत असणारी पाईपलाईन मोडून व विहीर बुजवून त्या ठिकाणी जे.सी.बी. मशीनच्या साहाय्याने रस्ता करण्याचा प्रयत्न दि. ०९.०२.२०२६ रोजी केला. वाद रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केल्याने वादीचे फार मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम लागेपर्यंत तहसीलदार यांनी पारित केलेल्या आदेशास स्थगिती देवून त्या आदेशाच्या आधारे प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या शेतजमिनीमधून वाद रस्ता काढू नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याची विनंती केली.

**प्रतिवादी क्र. १ तर्फे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः–**

११. प्रतिवादी क्र. १ याने वादीच्या अर्जाला नि.क्र. १४ प्रमाणे म्हणणे दाखल करून त्यातील कथने नाकारली. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, त्याची शेतजमीन गट क्र. १०७ मधून उजनी कॅनॉलचा उपफाटा पूर्वपश्चिम असा गेला असून त्या उपफाटयालगत कॅनॉल रस्ता पूर्व पश्चिम चालीचा आहे. तो रस्ता पुढे पुणे–पंढरपूर या मुख्य रस्त्याला मिळतो. शेत गट क्र. १०७ च्या दक्षिण बाजूस प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे शेतगट क्र. १०५ आहे. शेत गट क्र. १०५ च्या दक्षिण बाजूस शेत गट क्र. १०८ आहे व शेत गट क्र. १०८ च्या दक्षिण बाजूस प्रतिवादी क्र. १ चे गट क्र. १०९ आहे. शेत गट क्र. १०५ व १०८ या गटाला पूर्वीचा सर्व्हे नंबर ९१ आहे. त्या गटांना दक्षिणोत्तर चालीचा सर्व्हे नंबर बांध अस्तित्वात आहे.

१२. प्रतिवादी क्र. १ च्या शेत गट क्र. १०९ च्या पूर्व बाजूस वादींचे शेत गट क्र. १११ आहे व प्रतिवादी क्र. १ च्या शेत गट क्र. १०७ च्या पूर्व बाजूस वादींचा शेत गट क्र. ११२ आहे. शेत गट क्र. १११ व ११२ या गटांचा पूर्वीचा सर्व्हे नंबर ९३ आहे. त्या गटांना सुध्दा दक्षिणोत्तर चालीचा सर्व्हे नंबर बांध अस्तित्वात आहे. प्रतिवादी क्र. १ त्याचे शत गट क्र. १०९ मधून शेत गट क्र. १०७ मध्ये जाण्याकरिता वादी व प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या मालकीच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व्हे नंबर ९१ व ९३ च्या बांधावरून म्हणजेच सध्याचे गट क्र. १०५, १०८, १११ व ११२ च्या सर्व्हे नंबरच्या बांधावरून जात–येत होते व पुढे शेत गट क्र. १०७ च्या कॅनॉलपट्टीच्या रस्त्याला जात होते. परंतु सध्या वादी व प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी सदर सर्व्हे नंबरच्या बांधाने वाद रस्त्याचा वापर करण्यास स्पष्टपणे

नकार दिल्याने व प्रतिवादी क्र. १ ला सदर वाद रस्त्याशिवाय इतर कोणताही रस्ता वहिवाटीस नसल्याने त्याची शेतजमीन पडीक राहत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने तहसीलदार यांच्याकडे रस्ता केस करून वाद रस्त्याची मागणी केली. त्यामध्ये तत्कालीन तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ व १०९ च्या वहिवाटी करिता वाद रस्त्याशिवाय इतर कोणताही रस्ता नसल्याचे नमूद केले. त्यामुळे तहसीलदार माळशिरस यांनी पारित केलेला आदेश योग्य असून वादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**१३.** वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारात उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृत दर्शनी केस आहे का? | **होय.** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने झुकतो का? | **होय.** |
| ३. | अर्ज नाकारलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे का? | **होय.** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज मंजुर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ३ करीताः–

**१४.** मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता आवश्यक तथ्ये व दस्ताऐवज एकसारखेच असल्याने वरील तिन्हीं मुद्दे चर्चा करण्याकरीता एकत्रीत घेतली आहेत.

१५. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एन. कदम तसेच प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जी. तांबोळी यांचा युक्तीवाद ऐकला.

१६. वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या युक्तीवादावरून त्यांच्या शेतजमिनीच्या भौगोलिक परिस्थितीबाबत वाद नाही, हे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ च्या उत्तर बाजूला कॅनॉलपट्टीचा रस्ता असून दक्षिण बाजूला शेत गट क्र. १०५, त्याच्या दक्षिण बाजूला शेत गट क्र. १०८ व त्याच्या दक्षिण बाजूला प्रतिवादी क्र. १ शेत गट क्र. १०९ आहे. त्याच्या पूर्व बांधाने प्रतिवादींचे शेत गट क्र. १११/२, १११/१/अ/१ आहे, याबाबत वाद नाही.

१७. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, वादींचे शेत गट क्र. १११ व ११२ तसेच प्रतिवादी क्र. २ ते ८ चे शेत गट क्र. १०५ व १०८ च्या बांधावरून वाद रस्ता अस्तित्वात होता व तो वादी व प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी वापरण्यास प्रतिवादी क्र. १ ला मनाई केल्याने प्रतिवादी क्र. १ ने तहसीलदार माळशिरस यांच्याकडे रस्ता केस क्र. ३१/२०२२ दाखल केली. त्यामध्ये सुनावणी घेवून व प्रत्यक्ष पाहणी करून तहसीलदार यांनी वाद रस्ता मंजुर केला.

१८. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ व १०९ च्या वहिवाटी करिता प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या शेतजमिनी गट क्र. १०५ व १०८ व प्रतिवादी क्र. १ च्या शेतजमिनी गट क्र. १०७ व १०९ च्या पूर्व बाजूने असलेल्या बांधालगत रस्ता पूर्वापार पासून अस्तित्वात होता परंतु प्रतिवादींनी संगनमताने सदर रस्ता नांगरून वहिवाटीखाली आणला. त्यानंतर प्रतिवादी यांनी संगनमत करून मुद्दामपणे वादींचे शेत गट क्र. १११ व ११२ च्या पश्चिम बांधावरून नव्याने रस्त्याची मागणी करत आहेत.

१९. तहसीलदार यांनी दिनांक २४.१२.२०२५ रोजी रस्ता केस क्र. ३१/२०२२ मध्ये आदेश पारित करून प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ मधून उजनी कॅनॉल पट्टी रस्त्यापासून त्याची शेत जमीन गट क्र. १०९ मध्ये जाणेयेणेसाठी प्रतिवादी क्र. २ ते ८ यांचे शेत गट क्र. १०५ व १०८ तसेच वादी यांचे शेत गट क्र. १११ व ११२ च्या दरम्यान असणा–या बांधावरून १२ फुट रूंदीचा दक्षिणोत्तर चालीचा नवीन वाद रस्ता मान्य केलेला आहे.

२०. तहसीलदार यांनी पारित केलेल्या आदेशाच्या वैधतेवर वादिनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सदर आदेशाची वैधता, आवश्यकतेचा प्रश्न (necessity) व वाजवी प्रवेश (reasonable access) या बाबींचा अंतिम निर्णय प्रकरणाच्या गुणवत्तेवर दोन्ही बाजूंचे साक्षीपुरावे नोंदविल्यानंतर ठरविणे शक्य होईल. प्रस्तुत अर्ज निकाली काढताना न्यायालयाला न्यायाचा समतोल ठेवणे गरजेचे असून प्रतिवादी क्र. १ ला वाद रस्त्याशिवाय पर्यायी रस्ता उपलब्ध आहे

किंवा नाही हे प्रथमदर्शनी ठरविणे व वादींनी वाद निर्माण करण्यासारखी ठोस बाब मांडली आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

२१. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ ची शेतजमीन गट क्र. १०७ व १०९ च्या वहिवाटीकरिता प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतजमिनी गट क्र. १०५ व १०८ च्या पूर्वेकडील बांधाकडून गट क्र. १०७ च्या उत्तर बाजूने असलेल्या कॅनॉलपट्टीच्या रस्त्यापर्यंत जाणारा उत्तर दक्षिण चालीचा रस्ता अस्तित्वात होता. परंतु प्रतिवादींनी सदर रस्ता नांगरून वहिवाटीखाली आणला आहे. प्रतिवादी क्र. १ ने सुरूवातीला तहसीलदार माळशिरस यांच्याकडे रस्ता अर्ज क्र १७/२२ दाखल करून सदरचा रस्ता पूर्ववत करून मागितला. त्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ ने वादींना पक्षकार केले नव्हते व वादींच्या शेतजमिनीमधून सदर रस्ता जात असल्याबाबत त्याचे कथन सुध्दा नव्हते. परंतु त्यानंतर प्रतिवादींनी संगनमत करून वादींच्या शेतजमिनीमधून नवीन रस्ता तयार करण्याकरिता पुन्हा नवीन अर्ज रस्ता केस क्र. ३१/२०२२ तहसीलदार यांच्याकडे दाखल करून त्यात वादींना गैरअर्जदार क्र. ८ ते ११ म्हणून समाविष्ट केले व त्यांच्या शेतजमिनीमधून सुध्दा वाद रस्त्याची मागणी केली.

२२. वादींनी यादी नि.क्र. ४ सोबत प्रतिवादी क्र. १ ने दिनांक ०५.०८.२०२२ रोजी तहसीलदार यांच्याकडे प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्याविरूध्द दाखल केलेला रस्ता केस क्र १७/२२ च्या अर्जाची प्रमाणित प्रत दाखल केली. सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर अर्जाची प्रमाणित प्रत तहसीलदार माळशिरस यांनी दिनांक १२.०२.२०२६ रोजी वादींना दिली.

त्यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ने तहसीलदार माळशिरस यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे कलम १४३ अन्वये अर्ज दाखल करून प्रतिवादी क्र. १ ची शेतजमीन गट क्र. १०९ मधून जमीन गट क्र. १०७ ला लागुन असलेल्या कॅनॉल रस्त्याला जाण्या–येण्यासाठी प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या मालकीच्या जमीन गट क्र. १०५ व १०८ च्या पूर्व बांधाने दक्षिणोत्तर चालीचा १२ फुट गाडी रस्ता मिळण्याची मागणी केली. त्यामध्ये परिच्छेद क्र. ४ मध्ये प्रतिवादी क्र. १ ने असे कथन केले आहे की, तो यापूर्वी शेत गट क्र. १०९ मधून पुढे जावून प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या मालकीच्या गट क्र. १०५ व १०८ च्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व्हे नंबरच्या बांधाकडेने जात येत होता. परंतु सध्या प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी सदर रस्ता वापरण्यास नकार दिल्याने त्याने सदरचा अर्ज दाखल केला.

२३. प्रतिवादी क्र. १ यांनी वरीलप्रमाणे रस्ता मिळण्याचा अर्ज तहसीलदार माळशिरस यांच्याकडे दाखल केला असताना व तो प्रलंबित असताना त्यावर सुनावणी व निर्णय होण्याऐवजी प्रतिवादी क्र. १ यांनी पुन्हा तहसीलदार माळशिरस यांच्याकडे रस्ता केस क्र. ३१/२०२२ हा नव्याने अर्ज दिनांक ०७.११.२०२२ रोजी करून त्यामध्ये वादी यांना गैरअर्जदार क्र. ८ ते ११ सामील करून वाद रस्ता वादींचे शेत गट क्र. १११ व ११२ च्या बांधावरून अस्तित्वात असल्याबाबतचे कथन केले.

२४. सुरूवातीचा अर्ज प्रलंबित असताना पुन्हा नव्याने अर्ज दाखल होवून नवीन वाद रस्त्याची मागणी प्रतिवादी क्र. १ ने तहसीलदार माळशिरस यांचेकडे

केली ही बाब वरील प्रमाणे वादीने दाखल केलेल्या अर्जाच्या प्रमाणित प्रतींवरून स्पष्ट होते.

२५. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने सुरूवातीला तहसीलदार यांच्याकडे दाखल केलेल्या रस्ता केस नुसार त्याने मागणी केलेला रस्ता प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतातून अस्तित्वात होता. सदर रस्त्याची नोंद गावनकाशामध्ये सुध्दा आहे. वादींनी यादी नि.क्र. १५ सोबत मौजे तोंडले येथील गावनकाशाची प्रत दाखल केली. त्यामध्ये गट क्र. १११ च्या बांधाच्या पश्चिम बाजूने रस्ता असल्याचे दिसून येते. वादीचे असे कथन आहे की, सदर गावनकाशामध्ये दाखविलेला रस्ता म्हणजे प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतातून गेलेला रस्ता आहे.

२६. प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतातून सदर रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता व गट नकाशामध्ये असा कोणताही रस्ता दाखविलेला नाही. प्रतिवादी क्र. १ ने यादी नि.क्र. १८ सोबत भुमिअभिलेख कार्यालयाने सर्व्हे नंबर ९१ व ९३ च्या नकाशावरून दिलेली नक्कल दाखल केलेली आहे. त्यावरून सर्व्हे नंबर ९१ व ९३ मध्ये बांध असल्याचे दिसून येते. परंतु सदर नकाशाच्या नक्कलेवरून दोन्ही सर्व्हे नंबरच्या बांधावरून रस्ता आहे किंवा नाही याचा बोध होत नाही.

२७. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, त्याला त्याची शेतजमीन गट क्र. १०७ व १०९ ची वहिवाट करण्याकरिता वाद रस्त्याशिवाय कोणताही रस्ता उपलब्ध नाही. सदरची बाब तहसीलदार यांचे निकालामध्ये व त्यांनी केलेल्या

स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये सिध्द होते. वादींनी यादी नि.क्र. ४ सोबत तहसीलदार यांनी रस्ता केस क्र. ३१/२०२२ मध्ये केलेल्या स्थळपाहणी पंचनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली. त्यामध्ये असे नमूद आहे की, *''जमीन गट क्र. १११ च्या पूर्व बाजूने उजनी कॅनॉलवरून चालू वहिवाटीचा रस्ता दक्षिणेस जावून तो रस्ता जमीन गट क्र. १११ मधून पश्चिमेस जात असून तो पुढे जमीन गट क्र. १०८ मधून पश्चिमेस जावून नंतर सदर रस्ता पुढे जमीन गट क्र. १०८ च्या पूर्व बांधाने वहिवाटीस आहे. तो रस्ता अर्जदार यांच्या जमिनीचे पश्चिम बांधाने बाहेरून वहिवाटीस आहे तथापि जमीन गट क्र. १११ व १०८ मधील वहिवाटीचा रस्ता खाजगी मालकी जमीन गट क्र. १११ व १०८ चा आहे. जमीन गट क्र. १०८ व १११ मधील रस्त्याची हद्द सोडून इतर कोणताही रस्ता अर्जदार यांचे जमिनीपर्यंत पोहोच होत नाही.''*

२८. वरील पंचनाम्यावरून असे दिसून येते की, गट क्र. १११ व १०८ मध्ये नमूद केलेला रस्ता हा त्या गट नंबर मधील मालकांचा खाजगी रस्ता आहे. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी प्रतिवादी क्र. १ च्या शेतजमिनीमध्ये जाण्याकरिता असलेला रस्ता नांगरून वहिवाटीस आणल्याने तेथे रस्ता असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तहसीलदार यांच्या पंचनाम्यामध्ये इतर कोणताही रस्ता अस्तित्वात नसल्याचे नमूद आहे. परंतु तेथे रस्ता अस्तित्वात असल्याची बाब प्रतिवादी क्र. १ यांनी सुरूवातीला तहसीलदार यांच्याकडे केलेल्या रस्ता केस च्या अर्जावरून स्पष्ट होते.

२९. तहसीलदार यांनी रस्ता केस क्र. ३१/२०२२ मध्ये केलेल्या पंचनाम्यामध्ये असे नमूद केले आहे की, *''जमीन गट क्र. १११ मध्ये सरबांधालगत*

*जमीन गट क्र. १०५ व १०७ च्या बांधालगत चालू पाण्याची विहीर आहे. तसेच जमीन गट क्र. १११ जमीन गट क्र. १०७, १०५ व १०८ पेक्षा अंदाजे ५ ते ६ फुट उंचीवर आहे. तसेच जमीनगट क्र. १११ व १०७ च्या बांधालगत जमीन गट क्र. १११ मध्ये चिलार झाडे, लिंब झाड व चंदनाचे एक झाड आहे.''*

३०. यावरून असे स्पष्ट होते की, जेव्हा वादींच्या शेतजमिनी प्रतिवादींच्या शेतजमिनीपेक्षा ५ ते ६ फुट उंचीवर आहे तसेच वादींच्या शेताच्या बांधावर चिलार झाड, लिंब झाड व चंदनाचे एक झाड आहे व त्या बांधालगत चालू पाण्याची एक विहीर आहे अशा वेळी सदर बांधावरून वाद रस्ता मंजुर करणे योग्य होत नाही तथापि तसे करणे शक्य सुध्दा होणार नाही.

३१. वरील विवेचनावरून व प्रतिवादी क्र. १ यांनी तहसीलदार माळशिरस यांच्याकडे केलेल्या पहिल्या वाद रस्त्याच्या अर्जावरून प्रथमदर्शनी असे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ च्या शेतजमीन गट क्र. १०७ व १०९ च्या वहिवाटीकरिता प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतजमिनी गट क्र. १०५ व १०८ च्या पूर्व बांधालगत वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात होता. असे असताना सध्या वादींच्या शेत गट क्र. १११ व ११२ च्या बांधावरून वाद रस्ता तयार केल्यास त्यावर असलेली चालू पाण्याची विहीर, लिंब व चंदनाचे झाड यांचे नुकसान होईल. तथापि जेव्हा वादींचे शेत प्रतिवादींच्या शेतापेक्षा ५ ते ६ फुट उंच आहे अशावेळी वाद रस्ता तयार करणे सोयीचे सुध्दा होणार नाही.

३२. प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की, त्याला वाद रस्ता शिवाय इतर कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे त्याची शेतजमीन गट क्र. १०७ व १०९ पडीक आहे. परंतु वादींनी नमूद केले की, प्रतिवादी क्र. १ त्याच्या शेतजमिनी प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतातून असणा–या रस्त्याने वहिवाटत आहे. वादींनी यादी नि.क्र. १५ सोबत प्रतिवादी क्र. १ चे शेत गट क्र. १०७ व १०९ चे ७/१२ उतारे दाखल केले. त्यावरून गाव नमुना बारा मध्ये गट क्र. १०७ मध्ये सन २०१९ मध्ये केळीचे व सन २०२१ मध्ये मक्याचे पिक असल्याचे दिसून येते. तसेच शेत गट क्र. १०९ मध्ये सन २०१९ मध्ये मक्याचे व सन २०२१ मध्ये सागाचे पिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या शेतजमिनी पडीक आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

३३. प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, तहसीलदार माळशिरस यांनी पारित केलेला आदेश चुकीचा व बेकायदेशीर आहे असे वादींना या न्यायालयात दावा दाखल करून जाहीर करून मागता येत नाही. तसेच वादींनी तहसीलदार माळशिरस यांना सदर प्रकरणात पक्षकार केलेले नाही व दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० नुसार त्यांना कायदेशीर नोटीस सुध्दा दिलेली नाही. त्यामुळे वादींचा दावा व प्रस्तुत अर्ज चालु शकत नाही. त्याकरिता प्रतिवादी क्र. १ ने खालील न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली.

**१. मनोहर वसंत घेवारी विरूध्द महाराष्ट्र शासन, दुसरे अपील क्र.५०२/२०१७ निकाल तारीख ११.०४.२०२३**

**२. पांडुरंग चंद्रभान बाऊचे विरूध्द जालिंधर सारंधर तुपे, दुसरे अपील क्र. ३७५/२००६ निकाल तारीख २४.०७.२००८**

**३. हरिश्चंद्र उघडे विरूध्द महाराष्ट्र शासन, याचिका क्र. ८४९/२०१२ निकाल तारीख २४.०६.२०१३**

३४. प्रतिवादी क्र. १ चे असे प्रतिपादन आहे की, सदर वादातील दावा हा सरकारी अधिकारी (तहसीलदार) यांच्या कृत्याशी संबंधीत असूनही वादींनी तहसीलदार यांना आवश्यक पक्षकार म्हणून दाव्यात समाविष्ट केले नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० अन्वये कायदेशीर नोटीस दिलेली नाही. त्यामुळे वादींना कोणतीही दाद देता येणार नाही.

३५. वादींनी दाखल केलेला दावा प्रामुख्याने तहसीलदार माळशिरस यांनी पारित केलेला आदेश वैध नसून तो रद्द करण्याकरिता दाखल केलेला आहे. केवळ तहसीलदार यांनी आदेश पारित केला म्हणून ते सदर प्रकरणात आवश्यक पक्षकार होणार नाहीत. तहसीलदार यांनी पारित केलेल्या आदेशाची वैधता त्यांच्या अनुपस्थितीत सुध्दा प्रभावीपणे ठरविता येते. त्यामुळे सदर अर्ज निकाली काढताना तहसीलदार यांना पक्षकार न केल्याने सदरचा अर्ज फेटाळणे योग्य ठरत नाही. तथापि दाव्याच्या सुनावणी दरम्यान न्यायालयास जर तहसीलदार यांची उपस्थितीची गरज भासली तर दिवाणी प्रक्रिया संहिता चे आदेश १ नियम १० नुसार त्यांना पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याकरिता आदेश देता येईल.

३६. दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० नुसार सरकार/सरकारी अधिकारी विरूध्द दाद मागितली असता पूर्वसूचना देणे आवश्यक असते. तथापि तातडीच्या व तात्पुरत्या मनाई संदर्भातील दिलासा देण्याच्या बाबतीत न्यायालयाने प्रथमदर्शनी परिस्थिती, न्यायाचा समतोल व अपरिमित हानी या घटकांचा विचार करणे अपेक्षित आहे व अत्यावश्यक दाद मागण्याच्या दाव्यामध्ये कायदेशीर नोटीस कलम ८० नुसार न देता सुध्दा सदरची दाद मागितली जावू शकते. परंतु सदर दाव्यामध्ये तहसीलदार यांना पक्षकार म्हणून समाविष्ट केले नसल्याने तशी नोटीस देण्याची आवश्यकता सुध्दा नाही. त्यामुळे तात्पुरत्या मनाईच्या अर्जावर त्वरीत दिलासा देताना दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० नुसारची नोटिस एकमेव अडथळा ठरू शकत नाही. वरील विवेचनावरून तहसीलदार यांना पक्षकार न केल्याची व दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० प्रमाणे नोटीस न दिल्याची हरकत या दोन्ही बाबी यावेळी तात्पुरत्या मनाई च्या अर्जास फेटाळण्यासाठी निर्णायक नाहीत.

३७. प्रतिवादी क्र. १ चे असे सुध्दा म्हणणे आहे की, वादी सदर प्रकरणामध्ये तहसीलदार यांचा आदेश रद्द करून मिळण्याची घोषणा मागू शकत नाही. परंतु ***वासुदेव पंढरीनाथ राईकर विरूध्द मनोज मोहन दळवी व इतर, २०१८ (४) एम.एच.एल. जे. ९२७*** या न्यायनिर्णयामध्ये असे स्पष्ट केले आहे की, तहसीलदार / मामलेतदार यांनी पारित केलेल्या आदेशाची वैधता ठरविण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ (४) नुसार तहसीलदार यांचे आदेशाविरूध्द एका वर्षाच्या

आत दिवाणी न्यायालयात दावा दाखल करून दाद मागता येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ची हरकत योग्य नाही.

३८. प्रतिवादी क्र. १ ने भिस्त ठेवलेल्या न्यायनिर्णयातील तथ्य प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांशी विसंगत असल्याने ते सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ च्या बाजूने फायदेशीर ठरत नाही. ***मनोहर घेवरी*** या प्रकरणामध्ये माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता चे कलम ८० च्या नोटीसविना वादीला दावा दाखल करता येतो का व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ (४) नुसार दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल का असे दोन प्रश्न तयार करून सदरचे अपील दाखल करून घेतले. परंतु त्यानंतर त्यावर निर्णय होऊन त्याचा निकाल प्रतिवादीला फायदा होईल असा झाला असे त्याचे म्हणणे नाही. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे ***वासुदेव पंढरीनाथ राईकर*** या प्रकरणामध्ये वरीलप्रमाणे दाद दिवाणी न्यायालयात मागता येईल असे स्पष्ट केलेले आहे.

३९. ***पांडुरंग बाऊचे*** व ***हरीचंद्र उघडे*** या प्रकरणामध्ये असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे कलम १४३ व सुखाधिकार (easementary right) हे वेगवेगळे आहेत. परंतु सदर प्रकरणात याबाबत वाद नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने भिस्त ठेवलेले न्यायनिर्णय त्याने मांडलेल्या बाबींकरिता व हरकतीकरिता फायदेशीर ठरत नाही. हरीचंद्र उघडे या प्रकरणामध्ये तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे कलम १४३ नुसार रस्ता मंजूर केला होता परंतु अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी ते आदेश खारीज केले होते. अश्या परिस्थितीत इतर तीन महसूल न्यायालयाणी

दिलेला तात्पुरता रस्ता अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सक्षम दिवाणी न्यायालयाच्या आदेशपर्यंत कायम करणे गरजेचे होते असे निष्कर्ष नोंदविलेले आहेत. परंतु सदर प्रकरणात परिस्थिति वेगळी आहे. त्यामुळे वरील न्यायनिर्णयांचा प्रतिवादिस लाभ होवू शकत नाही.

४०. तहसीलदार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रतिवादी क्र. १ ची वाद रस्ता मागणी मान्य केली असली तरी सदर आदेशाची वैधता, आवश्यकतेचा प्रश्न या बाबींचा अंतिम निर्णय दाव्यातील पुराव्यावर अवलंबून राहिल. सदर अर्ज निकाली काढताना न्यायालयाला एवढेच पाहायचे आहे की, वादींनी वाद निर्माण करण्यासारखी ठोस बाब मांडली आहे का. वादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसते की, वादींचा दावा पूर्णपणे निराधार किंवा बनावट नाही. तसेच प्रतिवादी क्र १ च्या शेतजमीन गट क्र १०७ व १०९ च्या वाहिवाटी करीता प्रतिवादी क्र २ ते ८ चे शेत गट क्र १०५ व १०८ च्या बंधावरून रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजूने आहे.

४१. जर प्रतिवादी क्र. १ ला तहसीलदार माळशिरस यांच्या आदेशाप्रमाणे वाद रस्ता काढण्यास मुभा दिली तर प्रतिवादींच्या शेताच्या बांधालगत असणारी चालू पाण्याची विहीर, पाण्याच्या पाईपलाईन तसेच लिंब व चंदनाची झाडे नष्ट होवून वादींच्या जमिनींचे भौतिक स्वरूप कायमस्वरूपी बदलण्याची शक्यता आहे. यामध्ये बांध फोडणे, पाणीपुरवठा व्यवस्था, विहीर नष्ट होणे व इतर शेतीसंबंधीत संरचना बाधित होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे प्रतिवादी क्र. १ ला प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या शेतातून पर्यायी रस्ता असल्याची बाब प्रतिवादी क्र. १ ने स्वतः तहसीलदार

यांच्याकडे दाखल केलेल्या पहिल्या रस्ता केसच्या अर्जावरून स्पष्ट होत असल्याने प्रतिवादी क्र. १ ला पर्यायी रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने प्रतिवादी क्र. १ चे नुकसान भरून न येणारे आहे असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे.

४२. तात्पुरती ताकीद देताना न्यायालयाचा उद्देश कोणत्याही पक्षाला अंतिम दिलासा देणे असून अंतिम निर्णयापर्यंत वाद मालमत्तेची स्थिती कायम ठेवणे हा आहे. सदर प्रकरणात तेच न्याय्य व समतोल ठरेल. वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता वादींनी तात्पुरती ताकीद मिळविण्यासाठी आवश्यक तिन्ही अटीं पूर्ण केल्या असल्याने मी मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिताः–**

**४३.** वर नमुद केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी वादींनी सिध्द केले असल्याने, त्याअनुषंगाने वादी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. ४ च्या निष्कषार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. तहसीलदार माळशिरस यांनी रस्ता केस क्र. ३१/२०२२ मध्ये दि. २४.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत स्थगित करण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. १ ने स्वतः अगर मुखत्यार, एजेंट अगर अन्य कोनाकरवी वादींच्या शेत गट क्र. ११२, १११/१/अ/१ व ११२/२ या मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे रस्ता काढणे, बांध फोडणे, पाईपलाईन/विहीर नुकसान करणे किंवा वादींच्या शांततामय कब्जात अडथळा निर्माण करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.03.27 11:19:02 +0530

दि. २४/०३/२०२६

**(यु. बी. पेठे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : M. P. Gheradi.

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D & J.M.F.C Malshiras,Dist– Solapur

(c) Order signed by P.O. On : 24.03.2026

(d) Order uploaded on : 27.03.2026